# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

C/O महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४
दूरध्वनी क्र. :- 020-29709617, 29709396 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscepune@gmail.com


**दरपत्रक सूचना**

जा.क्र.मरापप/भांडार/Tally/2025/ 192
दिनांक :- 14 /01/2025

प्रति,

-----------------------

-----------------------

-----------------------

**विषय :- आर्थिक वर्ष सन 2024-2025 व सन 2025-2026 वर्षाकरिता लेखा शाखेतील Tally Software मध्ये करावयाच्या कामकाजाकरिता सनदी लेखापाल/तत्सम संस्थेची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक मागविणेबाबत..**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमधील, लेखा शाखेतील Tally Software मध्ये दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी घेवून त्याचा ताळमेळ घेण्यासाठी लेखा विषयक घेतल्या जाणाऱ्या परीक्षेच्या जमा खर्चाचा ताळमेळ घेण्यासाठी प्रत्येक आर्थिक सन 2024-2025 व सन 2025-2026 वर्षानिहाय करावयाच्या कामकाजाकरिता सनदी लेखापाल/तत्सम संस्थेची नियुक्ती करणेकरिता सिलबंद सिलबंद पाकिटात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

1. दरपत्रक सिलबंद पाकिटात व पाकिटावर **Tally Software मध्ये करावयाच्या कामकाजाबाबत दरपत्रक** लिहावे.
2. दरपत्रक स्विकृतीची वेळ सकाळी 09.45 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत असून, प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 21/01/2025 रोजी चौथ्या मजल्यावरील आयुक्त दालनात उघडण्यात येईल. त्यावेळेस आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा परिषदेच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यात येतील. दरपत्रक सादर करणे अंतिम दि. 20/01 /2025 रोजी सायंकाळी 05.00 पर्यंत.
3. दरपत्रकात सेवेसाठीचा दर वस्तू व सेवा इतर सर्व करासहित (GST) समाविष्ट करण्यात यावा.
4. सेवा पुरवठादाराकडे अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.
5. दरपत्रकामधील सेवा सर्व साधारणपणे ज्यांना सेवा देण्याबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांनी **Tally Software** चे अनुषंगांने सर्व कामकाज करणे.
6. सदरचे कामकाज कार्यालयीन वेळेत पार पाडावयाचे आहे. आणि सदर कामकाजासंबंधित कोणतेही काम प्रलंबित न ठेवणेची जबाबदारी संस्थेची राहील.
7. सनदी लेखापालाची सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल, याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.
8. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही. याची काळजी घ्यावी.
9. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.
10. **लखोटा क्र.1** मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे जोडून सिलबंद करण्यात यावा व त्यावर तांत्रिक कागदपत्रे बाबतचा लखोटा असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

11. **लखोटा क्र.2** मध्ये वित्तीय दर सर्व करासहित नमूद करुन लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर दराचा लखोटा असे स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
12. लखोटा क्र.1 मधील दर्शविलेली प्रमाणपत्रे अपूर्ण असल्यास लखोटा क्र.2 वित्तीय उघडण्यात येणार नाहीत.
13. मंजूर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.
14. संस्थेकडून अटी नमूद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. परिषदेकडून याबाबत सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत वा त्याकडून पत्रव्यवहार करण्यास परिषद बांधील राहणार नाही.
15. दरपत्रक धारकांनी खोटी व बनावट कागदपत्रे सादर केल्याचे तपासणी अंती आढळून आल्यास अशा दरपत्रक धारकांवर आवश्यकतेप्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत निर्णय घेण्यात येईल.
16. **Tally Software** चे अनुषंगांने सर्व कामकाज करणे विषयी दरपत्रक मागविणेत आलेनुसार सविस्तर माहिती घ्यावयाची असल्यास, लेखा शाखेशी संवाद/संपर्क साधण्यात यावा.
17. सदर दरपत्रक परिषदेच्या संकेतस्थळांवर **www.mscepune.in** उपलब्ध आहे.

**लखोटा क्र.1 तांत्रिक कागदपत्रे -**

1. संस्था पाच वर्षापासून अस्तित्वात असल्याचे प्रमाणपत्र
2. वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र.
3. संस्थेचे/प्रोप्रायटर यांचे पॅन कार्ड प्रत.
4. ITR Assessment Year 2023-2024, 2024-25.
5. स्थापनेपासून आजतागायत संस्था काळ्या यादीत नसल्याचे स्वत: चे लेटरहेडवर प्रमाणपत्र.
6. शासकीय/निमशासकीय/खाजगी क्षेत्रात Tally Software चे कामकाज केल्याचा दोन वर्ष अनुभव. (झेरॉक्स प्रती)

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

## Tally Software मध्ये करावयाच्या कामकाजाबाबतचे वित्तीय दरपत्रक

**लखोटा क्र.2 (वित्तीय दर) -**

| अ.क्र. | कामकाजाचे तपशिल | दर GST व इतर सर्व करांसहित (रुपये) |
|---|---|---|
| 1. | 1.**Tally Software** चे अनुषंगांने सर्व कामकाज सन 2024-25<br>2.**Income Tax व GST** चे अनुषंगांने कामकाज. | |
| 2. | 1.**Tally Software** चे अनुषंगांने सर्व कामकाज सन 2025-26.<br>2.**Income Tax व GST** चे अनुषंगांने कामकाज. | |

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.